| MHSN040005362024 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक | ०८/०७/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | ०९/०७/२०२४ |
| | निर्णय दिनांक | ०१/०४/२०२६ |
| | कालावधी | ०१ व ०८ म २४ दि |
| | **निशाणी नं.** | |

| | |
|---|---|
| | **<u>तदर्थ जिल्हा न्यायाधीश क्र.१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,</u>**<br>**<u>इस्लामपूर यांचे न्यायालयात,</u>**<br>**पिठासीन अधिकारी –**<br>श्रीमती. ए. एच. काशीकर, सत्र न्यायाधीश |
| | निकाल दिनांक – ०१/०४/२०२६ |
| | **सत्र खटला नं.३५/२०२४** |
| | गु.र.नं.१५९/२०२३<br>पोलीस स्टेशन – शिराळा<br>भा.द.वि. कलम ३०६ |
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे, शिराळा** |
| तर्फे विधीज्ञ | श्रीमती शुभांगी पाटील, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | प्रणाली प्रमोद कोळी,<br>वय – २७ वर्षे, व्यवसाय – घरकाम,<br>रा.शिरढोण, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर. |
| **तर्फे विधीज्ञ** | श्री. डी.डी.पाटील |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १५/०८/२०२३ |
| प्रथम खबर नोंदविल्याचा दिनांक | ०७/०९/२०२३ |
| दोषारोप पत्र दाखल केल्याचा दिनांक | २१/०३/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २४/०२/२०२५ |
| पुरावा नोंदविणेस सुरुवात केल्याचा दिनांक | ०४/०८/२०२५ |
| न्यायनिर्णयास ठेवलेचा दिनांक | ०१/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०१/०४/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याचा दिनांक | -- |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडलेचा दिनांक | दोषारोपाचा तपशील | दोषी किंवा निर्दोष | शिक्षेचा कालावधी | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रणाली प्रमोद कोळी | अटकपूर्व जामीन | -- | भा.द.वि. कलम ३०६ | निर्दोष | – | -- |

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयातर्फे तपासलेल्या साक्षीदारांची यादी

अ. अभियोग पक्ष :

| सा.क्र. | नांव | तपशिल |
|---|---|---|
| १ | जयश्री पांडूरंग कोळी | फिर्यादी |

| | | |
|---|---|---|
| २. | डॉ. अनिरुध्द सतिश काकडे | वैद्यकीय अधिकारी |
| ३. | स्वाती दयानंद घोडके | साक्षीदार |
| ४. | जयसिंग प्रतापराव पाटील | तपासी अंमलदार |

ब. बचाव पक्षातर्फे साक्षीदार, असल्यास :

| सा.क्र. | नांव | तपशील |
|---|---|---|
| -- | नाही | -- |

क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :

| सा.क्र. | नांव | तपशील |
|---|---|---|
| -- | नाही | -- |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय तर्फे दाखल कागदपत्रांची यादी**

अ. अभियोग पक्षातर्फे दाखल कागदपत्र :

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नि.पी-१ | प्रथम खबर अहवाल |
| २ | नि.पी-२ | वर्दी जबाब |
| ३ | नि.पी-३ | फिर्यादीचा कलम १६४ फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत जबाब |
| ४ | नि.पी-५ | पोस्टमॉर्टम रिपोर्ट |
| ५ | नि.पी-६ | अडव्हान्स पोस्टमॉर्टम सर्टिफिकेट |

| | | |
|---|---|---|
| ६ | नि.पी– १० | तपासाचे लेखी आदेश |
| ७ | नि.पी–११ | दि.२९.१२.२०२३ रोजी न्यायवैद्यक प्रयोगशाळा कोल्हापूर यांना पाठवलेल्या पत्राची स्थळप्रत |

ब१. बचाव पक्षातर्फे दाखल कागदपत्राची यादी :

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नि.पी.–४ | किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३३३/२०२५ मधील जाबदार क्र.१ ते ३ चे अर्जदारचे अर्जास म्हणणे |

ब२. बचाव पक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी

| क्र. | नि. क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नि.पी–७ | दि.१५.०८.२०२३ रोजीचा घटनास्थळ पंचनामा |
| २ | नि.पी–८ | दि.१५.०८.२०२३ रोजीचा मरणोत्तर पंचनामा |
| ३ | नि.पी–९ | दि.१५.०८.२०२३ रोजीचा मोबाईल जप्ती पंचनामा |

क. न्यायालयातर्फे निशाणी :

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नि.१६ | दोषारोप |
| २ | नि.३२ | अभियोग पक्षातर्फे पुरावा बंद केल्याची पुरशिस. |
| ३ | नि.३३ | आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब. |

ड. भौतिक वस्तू :

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| --- | --- | नाही. |

**न्यायनिर्णय**

**(<u>दिनांक ०१/०४/२०२६</u>)**

आरोपीवर भा.द.वि. (भारतीय दंड विधान संहीता – संक्षिप्त) चे कलम ३०६ प्रमाणे प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

**<u>अभियोग पक्षाचे कथन</u>** –

२. अभियोग पक्षाने नमूद केलेले घटनेची संक्षिप्त हकीकत पुढील प्रमाणे–

प्रस्तुतची घटना दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजी शिराळा येथे घडलेली असून फिर्यादी जयश्री पांडुरंग कोळी यांनी या घटनेसंदर्भात पोलीस स्टेशन शिराळा येथे तक्रार दाखल केली. मयत प्रमोद पांडुरंग कोळी हा फिर्यादी जयश्री कोळी यांचा मुलगा असून त्याचे आरोपी प्रणाली कोळी हिच्याशी दिनांक ९ मार्च २०२३ रोजी लग्न झाले होते. तो शिराळा वन विभागामध्ये वनरक्षक म्हणून कार्यरत होता. फिर्यादीच्या कथनानुसार लग्नाच्या दिवशीच मयत व प्रणाली यांच्यामध्ये मोबाईल वरून वाद झाला होता व प्रणालीने प्रमोदच्या मानेवर नखाने ओरबडले होते. त्यानंतर पूजेच्या कार्यक्रमाकरिता प्रणालीचे माहेरचे लोक त्यांच्या घरी आले असता त्यांच्यात व प्रमोद यांच्यात आपसात चर्चा झाली होती व फिर्यादीचा दुसरा मुलगा विनोद

हा ती चर्चा ऐकण्यास गेला असता मयताने त्याला तेथे येण्यास नकार दिला होता, त्यामुळे त्या वादाचे स्वरूप त्यांना कळू शकले नाही. यानंतर काही दिवसांनी आरोपी प्रणाली तिच्या माहेरी गेली व स्वतःचा फोन माहेरीच ठेवून परत आली होती. त्यानंतर काही दिवसांनी मयत प्रमोद व आरोपी प्रणाली शिराळा येथे भाड्याच्या खोलीत रहावयास गेले. फिर्यादी एप्रिल २०२३ मध्ये एक महिना त्यांच्याकडे राहिली. त्या कालावधीत त्या दोघांचे वारंवार भांडण होत होते. प्रमोद कामाला गेल्यावर प्रणाली मोबाईल घेऊन बसत होती व तिचे घर कामाकडे लक्ष नव्हते. प्रमोद सतत तणावाखाली असायचा. फिर्यादीने तक्रारीत पुढे असे नमूद केले की, मुलीच्या प्रसूती कामी ती दिनांक २९ एप्रिल २०२३ रोजी बोरपाडळी या त्यांच्या गावी गेली. त्या दरम्यान आरोपी प्रणालीस तिच्या माहेरचे लोक वारंवार भेटायला येत होते व प्रणाली सोबत झालेले भांडण प्रमोद वारंवार तिला फोन करून कळवत होता.  दिनांक १३ ऑगस्ट २०२३ रोजी रात्री ९.३० वाजता तिला प्रमोदचा फोन आला होता व त्याने तो बहिणीकडे विंग येथे जाऊन आल्याचे सांगितले होते. दिनांक १५ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ७.४० वाजता आरोपी प्रणाली हिच्या माहेरहून तिची आई व मेहुणा यांनी त्यांना फोनद्वारे कळवले की, प्रमोद शिराळा येथील राहत्या घरात खोलीचा दरवाजा बंद करून झोपला आहे व तो दार उघडत नसल्यामुळे तुम्ही शिराळा येथे निघून या. फिर्यादी ११.४५ वाजेदरम्यान शिराळा येथे पोहोचली असता तिला व तेथे जमा झालेल्या लोकांना मयत प्रमोद घरातील खोलीमध्ये पंख्याला दोरीने गळफास घेऊन मयत अवस्थेत लटकत असलेला दिसला. त्यानंतर त्याला शिराळा दवाखान्यात पाठवले असता तो मयत झाल्याचे निदान झाले.

३.  फिर्यादीच्या कथनानुसार आरोपी प्रणाली हिचे अन्यत्र मुलाशी प्रेम संबंध होते. ते लपवून ठेवून मयत प्रमोदशी तीचे लग्न करण्यात आले. तिच्या विवाहबाह्य प्रेमसंबंधांमुळे प्रणाली व प्रमोद यांच्यात वारंवार भांडणे होत असून प्रणालीने प्रमोदचा मानसिक छळ केला व असा त्रास देऊन प्रणालीने प्रमोदला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले व त्यामुळे त्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. म्हणून फिर्यादीने प्रस्तुतची तक्रार पोलीस स्टेशन शिराळा येथे दिनांक ७ सप्टेंबर २०२३ रोजी दाखल केली. तिच्या कथनानुसार मुलाच्या मृत्यूमुळे तिला मानसिक धक्का बसला होता व ती आजारी होती म्हणून तक्रार दाखल करण्यास विलंब झाला.

४.  फिर्यादीच्या तक्रारीवरुन शिराळा पोलीसांनी आरोपी विरुध्द भा.द.वि. (भारतीय दंड विधान संहीता – संक्षिप्त) कलम ३०६ प्रमाणे गुन्हा रजि. नं.१५९/२०२३ नोंदविला.

५.  तपासी अधिकारी यांनी सदर गुन्ह्याचा तपास केला. घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. मयताचा मरणोत्तर पंचनामा तयार केला. प्रकरणातील साक्षीदारांचे जबाब त्यांचे सांगण्यानुसार नोंदविले. आरोपीचे विरुध्द पुरेसा पुरावा मिळुन आल्याने त्यांनी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

६.  आरोपीचे विरुध्द निशाणी १६ अन्वये दोषारोप निश्चित करण्यात आले. आरोपीने तिच्यावरील आरोप फेटाळुन लावले व खटला चालवण्याची विनंती केली.

७.     न्यायालयात खटला चालविण्यात आला. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार तपासण्यात आले व दस्तऐवज शाबीत करण्यात आले. तसेच अभियोग पक्षाने निशाणी ३२ अन्वये पुरावा बंद केल्याची पुरसीस दाखल केली.

८.     सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती शुभांगी पाटील व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. डी.डी.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

९.     सरकार पक्षाची केस व एकंदरीत परिस्थिती विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| **क्रं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दिनांक १५/०८/२०२३ रोजी सकाळी ७.४० वाजेदरम्यान, श्रीराम कॉलनी, शिराळा, ता.शिराळा, जि.सांगली येथे आरोपीच्या राहत्या भाड्याच्या खोलीत प्रमोद पांडूरंग कोळी याने आत्महत्या केली आणि आरोपीने त्यांचा मानसिक व शारिरीक छळ करुन त्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिताचे कलम ३०६ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | .. नाही. |

| | | |
|---|---|---|
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**विद्वान सरकारी वकीलांनी केलेला युक्तिवादः–**

१०. वि. सरकारी वकिलांच्या युक्तिवादानुसार फिर्यादी ही मयताची आई असून त्याची सर्वात जवळची नातेवाईक होती. मयताने तिच्या समक्ष आरोपी सोबत होणारी भांडणे व त्याचे कारण वारंवार उघड केले होते व आरोपीने दिलेल्या मानसिक त्रासामुळेच मयत आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाला. सदर बाब फिर्यादीने न्यायालयात सांगितलेली असल्यामुळे तिचा तोंडी पुरावा हा आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यास पूर्णतः सबळ व विश्वासार्ह आहे. त्याचप्रमाणे वैद्यकीय अधिकारी डॉ.अनिरुद्ध सतीश काकडे यांच्या पुराव्यानुसार ही बाब सिद्ध होते की, मयताचा मृत्यू आत्महत्येने झालेला आहे, तर साक्षीदार क्रमांक ३ स्वाती दयानंद घोडके या मयत राहत असलेल्या घराच्या घरमालक असून त्यांच्या पुराव्यानुसार घटनेच्या आदल्या दिवशी देखील आरोपी फोनवर बोलत असल्याने मयत व आरोपी यांच्यात वाद झाला होता व हा वादच मयतास आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणारा होता. सर्व साक्षीदारांच्या या साक्षींचा सर्वंकष विचार केला असता, केवळ आरोपीने दिलेल्या मानसिक त्रासामुळेच मयताने तणावाखाली येऊन आत्महत्या केल्याची बाब अभियोग पक्षाने सबळ व निर्णायक पुराव्यानिशी सिद्ध केलेली आहे. अभियोग पक्षाच्या सर्व साक्षीदारांच्या साक्षी पूर्णतः विश्वासार्ह आहेत.

अभियोग पक्षाने मयताचा मृत्यू व आरोपीने त्याला प्रवृत्त केल्याची घटना यातील समन्वय सिद्ध केलेला आहे. म्हणून आरोपी कलम ३०६ भा.द.वी. अंतर्गत पूर्ण शिक्षेस पात्र आहे.

**<u>आरोपीच्या वि.वकीलांनी केलेला युक्तीवादः–</u>**

११.   आरोपीच्या वि. वकिलांनी केलेल्या युक्तिवादानुसार आरोपी पूर्णतः निर्दोष असून फिर्यादीने केवळ मयताच्या मृत्यूनंतर आरोपीस अनुकंपा तत्वावर नोकरी लागू नये व मयताचा भविष्य निर्वाह निधी तिला प्राप्त होऊ नये, यासाठी खोट्या गुन्ह्यात अडकवले आहे. घटनेचा एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. प्रकरणातील सर्व साक्षीदार हे ऐकीव व परिस्थितीजन्य साक्षीदार आहेत. अभियोग पक्षाने परिस्थितीजन्य पुराव्याची साखळी सिद्ध केलेली नाही. नेहमीच्या संसारातील शुल्लक भांडणे आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणारी भांडणे नसतात. तसेच अभियोग पक्षाने भांडणाचे व आत्महत्या करण्यास प्रवृत्त करण्याची घटना व आत्महत्या यातील साखळी जोडलेली नाही.  शिवाय वादातीत घटना दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजी घडलेली असून या घटनेची फिर्याद दिनांक ७ सप्टेंबर २०२३ रोजी म्हणजेच २३ ते २४ दिवसांच्या विलंबाने दाखल करण्यात आली. सदरच्या विलंबाचे स्पष्टीकरण अभियोग पक्षाने समाधानकारकरित्या दिलेले नाही व त्यामुळे हा विलंब अभियोग पक्षास मारक ठरतो. शिवाय फिर्यादीच्या साक्षीला स्वतंत्र पुष्टी देणारा पुरावा अभियोग पक्षाने नोंदवलेला नाही. फिर्यादीने मयताची भविष्य निर्वाह निधी मिळण्यासाठी वारसा दाखला मिळणे कामी कोल्हापूर न्यायालयात वारसा दाखला प्रकरण दाखल केल्यानंतर ही तक्रार दिलेली

आहे. यावरून ही बाब सिद्ध होते की, केवळ आरोपीला ती मयताची पत्नी असल्याने अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळू नये व भविष्य निर्वाह निधी रकमेत हिस्सा मिळू नये, याकरिता ही खोटी तक्रार दाखल करण्यात आली. सर्व साक्षीदारांच्या साक्षीत मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. अभियोग पक्षाने भा.द.वि.च्या कलम ३०६ अंतर्गतचे कलम आरोपीविरुद्ध सिद्ध केलेले नाही व आरोपीवरील दोषारोप संशय रहित पुराव्यानिशी सिद्ध झालेले नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे.

**मुद्दा क्र. १ बाबत –**

१२. वरील युक्तिवादाच्या अनुषंगाने मी अभियोग पक्षाचा साक्षी पुरावा विश्लेषित केला. साक्षीदार क्रमांक १ जयश्री पांडुरंग कोळी ही फिर्यादी असून तिने निशाणी २४ वर साक्ष देताना असे नमूद केले की, मयत प्रमोद कोळी तिचा सर्वात मोठा मुलगा होता. त्याला वनविभागात त्याच्या वडिलांच्या जागेवर वन रक्षक म्हणून अनुकंपा तत्वावर नोकरी लागली होती. घटनेच्या वेळी तो ३३ वर्षे वयाचा होता व शिराळ्यावरून चांदोली येथे नोकरीला जात होता. तिचे पती २००५ मध्ये वारले होते व प्रमोदला २०२१ मध्ये नोकरी लागली होती. नोकरी लागल्याच्या दोन वर्षांनंतर त्याचे आरोपी प्रणालीशी लग्न झाले होते. लग्नाच्या पाचव्या दिवशी प्रणाली व प्रमोद यांच्यात भांडण झाले व तिने त्याच्या मानेला नखाने ओरबडले होते. तिला विचारल्यानंतर तिने त्याचे कारण सांगितले नव्हते. प्रमोदने सांगितल्यानुसार त्यांच्यात मोबाईल वरून झटापट झाली होती.

१३. पुढे या साक्षीदाराने नमूद केले की, प्रणालीचा भाऊ व प्रमोद एकदा शेतातील शेडमध्ये गेले होते व तिचा दुसरा मुलगा विनोद त्यांच्या मागे गेला असता प्रमोदने त्याला येऊ दिले नव्हते. त्यानंतर प्रणालीची आई, भाऊ, प्रणाली व प्रमोद हे घरातील माडीवर चर्चा करत असताना तिने त्याबाबत विचारले असता प्रणालीचा भाऊ म्हणाला होता की, तो प्रमोदला समजावत आहे. त्यावेळी प्रमोद रडायला लागला होता. लग्नाच्या पाचव्या दिवशी प्रणाली माहेरी गेली असता स्वतःचा मोबाईल तेथेच ठेवून आली होती. त्यानंतर ते दोघेही शिराळा येथे एकत्र राहत होते. फिर्यादी तेथे एक ते दीड महिना राहिली होती व तेव्हाही तिला त्यांच्या भांडणाचा आवाज ऐकू येत होता. प्रमोदने तिला भांडणाचे कारण सांगितले नव्हते. तो तणावाखाली होता. पुढे या साक्षीदाराने सांगितले की १३ तारखेला प्रमोद विंग येथे तिची मुलगी पूनम हिच्याकडे गेला होता व हे त्याने रात्री फोन करून कळवले होते. मात्र १४ तारखेला त्याने फोन केला नाही. १५ तारखेला प्रणालीची आई व भावाने सकाळी फोनवरून प्रमोद दार उघडत नसल्याचे कळवले व त्या १२.०० ते १२.१५ वाजेदरम्यान पुण्यावरून शिराळ्याला पोहोचल्या असता त्यांना प्रमोद फॅनला लटकलेला दिसला. सदर घटनेबाबत त्यांनी पोलीस स्टेशन शिराळा येथे वर्दी जबाब व प्रथम खबर अहवाल दिला. तो निशाणी पी–१ व पी–२ वर असून न्यायालयात कलम १६४ फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत नोंदवण्यात आलेला जबाब निशाणी पी–३ वर आहे.

१४. मी यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे आरोपीने घेतलेल्या बचावानुसार फिर्यादी व तिच्या कुटुंबीयांना मयताचा पूर्ण भविष्य निर्वाह निधी स्वतःला हवा

असून तो आरोपीला मिळू देण्याची इच्छा नव्हती. तसेच तिला मयताच्या जागी अनुकंपा तत्वावर नोकरीही मिळू द्यायची नव्हती, म्हणून २३ ते २४ दिवसांच्या विलंबाने पूर्व चर्चा करून पूर्व नियोजित पद्धतीने आरोपी विरुद्ध खोटी तक्रार देण्यात आली आहे. या अनुषंगानेच फिर्यादीची उलट तपासणी घेण्यात आली. फिर्यादीने तिच्या उलट तपासणीत हे मान्य केले की, तिने कोल्हापूर न्यायालयात वारसा दाखला मिळण्यासाठी दिवाणी दावा क्रमांक ४७१/२०२३ हा दिनांक ८ नोव्हेंबर २०२३ रोजी दाखल केला. त्यापूर्वी दिनांक ५ सप्टेंबर २०२३ रोजी ती वनविभाग कार्यालयात तिची मुलगी पूनम हिला मयताच्या जागी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याकरिता व मुलाची भविष्य निर्वाह निधीची रक्कम मिळण्याकरिता गेली होती व वन अधिकारी यांनी त्यांना मुलाचा वारसा दाखला आणण्यासाठी सांगितले होते. असा दाखला आणायला सांगितल्यानंतर दिनांक ७ सप्टेंबर २०२३ रोजी तिने पोलीस स्टेशनला आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली, हे आठवत नाही असे फिर्यादीने सांगितले असले तरी, निशाणी पी–१ व पी–२ चे वाचन केले असता ही बाब सिद्ध होते की, दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजी घडलेल्या घटनेसंदर्भात फिर्यादीने दिनांक ७ सप्टेंबर २०२३ रोजी तक्रार दाखल केली. घरगुती अडचणीमुळे तक्रार द्यायला वेळ झाला असे स्पष्टीकरण तिने सरतपासात दिले. मात्र हे स्पष्टीकरण तिच्या वर्दी जबाबातील स्पष्टीकरणापेक्षा वेगळे असून त्याबद्दल फिर्यादीने कुठलेही कथन केलेले दिसून येत नाही. म्हणूनच सदरचा विलंब घरगुती अडचणीमुळे झालेला नसून बचाव पक्षाने सांगितल्यानुसार केवळ वन अधिकाऱ्यांनी दिनांक ५ सप्टेंबर २०२३ रोजी वारसा दाखला आणण्यास सांगितल्यामुळे व आरोपी देखील मयताची वर्ग–१ ची वारस

असल्याचे व तिलाच यासंदर्भात प्राथमिकता दिली जाण्याची शक्यता असल्याने, तिचा हक्क डावलण्यासाठी ही तक्रार दाखल करण्यात आली, ही शक्यता मला जास्त वाटली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे फिर्यादीने हे मान्य केले की, न्यायालयातून वारसा दाखला घेऊन त्यांनी प्रमोदच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम काढून घेतली व त्यापैकी कोणताही हिस्सा प्रणालीला दिला नाही. शिवाय तिने हेही मान्य केले की, आरोपीने जो किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३३३/२०२५ दाखल केला त्याला खुलासा देताना त्यांनी असे नमूद केले की, प्रणाली प्रमोदची कायदेशीर वारस नव्हती. आरोपीने सदर खुलाशाची प्रमाणित प्रत साक्षीदाराला उलटतपासणीत दाखवून निशाणी पी–४ वर निशाणीबद्ध केली. फिर्यादीने आरोपी प्रणाली व मयत प्रमोद यांचे लग्न कायदेशीररित्या झाले होते हे उलटतपासणीत मान्य केले. शिवाय स्वतः दाखल केलेल्या वारसा दाखला अर्जात प्रमोदचे लग्न झाले नव्हते असे शपथपत्रावरील पुराव्यात सांगितले, या प्रश्नावर साक्षीदाराने बराच वेळ मिळूनही उत्तर दिले नाही. फिर्यादीचे न्यायालयातील हे वर्तन व इतर कबुल्या यांचा सारासार विचार करता ही बाब निदर्शनास येते की, फिर्यादी व तिच्या कुटुंबीयांनी कोल्हापूर येथील वारसा दाखला अर्जामध्ये आरोपी प्रणाली कोळी मयताची पत्नी असल्याची बाब हेतूपुरस्सर लपवली व त्यांना मयताच्या जागी आरोपीला अनुकंपा तत्वावर नोकरी मिळू नये व ही नोकरी मयताची बहीण पूनम हिला मिळावी असे वाटत होते. शिवाय सदर वारसा दाखला घेऊन फिर्यादीने मयताची भविष्य निर्वाह निधीची संपूर्ण रक्कम प्राप्त केली असून त्यात कुठलाही हिस्सा आरोपी प्रणाली हिला दिलेला नाही. दिनांक ७ सप्टेंबर २०२३ रोजी आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल करण्यापूर्वी सदर आरोपीविरुद्ध

कुठलाही गुन्हा नोंदवला नसताना व तसे कुठलेही कारण नसताना वारसा दाखला अर्जात फिर्यादी व कुटुंबीयांनी मयताच्या वैवाहिक स्थितीबाबत खोटी माहिती नमूद केली, यावरूनच मयत व त्याच्या कुटुंबीयांचा मानस आरोपीला तिच्या पत्नी या नात्याने मिळू घातलेल्या कायदेशीर हक्कापासून तिला वंचित ठेवणेचा होता, असे या पुराव्यावरून दिसून येते. त्यामुळे गुन्ह्याची पहिली खबर दाखल करण्यास झालेला विलंब हा हेतूपुरस्सर असून तो अभियोग पक्षास मारक ठरला, असे अनुमान मी काढले. दुसरी महत्वाची बाब म्हणजे अभियोग पक्षाने तपासी अंमलदार ए.पी.आय. जयसिंग प्रतापराव पाटील यांची साक्ष नि.३१ वर नोंदवली असता सदर साक्षीदाराने देखील उलटतपासणीत हे मान्य केले की, ए.डी.आर. व गुन्ह्याची पहिली खबर यात २४ दिवसांचा विलंब असून त्याबाबत कुठलेही स्पष्टीकरण दोषारोपपत्रात देण्यात आलेले नाही. यावरुनच सदरचा विलंब हेतुपुरस्सर आहे असे ध्वनीत होते.

१५.   दुसरी महत्वाची बाब म्हणजे बचाव पक्षाच्या कथनानुसार मयत स्वतःच मानसिक दृष्टीने कमकुवत होता. त्याचे सन २००९ मधे शिक्षण पुर्ण झाले असून २०२१ मधे त्याला अनुकंपा तत्वावर नोकरी लागली. या संपुर्ण कालावधीत तो बेरोजगार होता, तसेच त्याचे लग्नही झाले नव्हते. त्यामुळे लग्न व रोजगार या दोन्ही बाबीत अपयश आल्याने तो मानसिक तनावाखाली होता व त्यातूनच ही आत्महत्या करण्यात आली. यासंदर्भात फिर्यादीने हे मान्य केले की, मयताचे अभियांत्रीकीचे शिक्षण सन २००९ मधे पुर्ण झाले व त्याला सन २०२१ मधे वनविभागात अनुकंपा तत्वावर नोकरी मिळाली. तिने हेही मान्य केले की प्रमोद ही नोकरी करायला तयार नव्हता व त्यानेच दि.०४

एप्रिल २०१९ रोजी त्याच्या ऐवजी त्याचा भाऊ विनोद याला ही नोकरी मिळण्यासाठी वनविभागात अर्ज केला होता. त्यांनी हे मान्य केले की, सन २०२१ मधे ही अनुकंपा तत्वावरील नोकरी मिळण्यापूर्वी मयत नोकरी करत नव्हता व विनोद त्याच्यापेक्षा दोन वर्षे लहान असूनही त्याचे मयताच्या लग्नाआधीच लग्न झाले होते. फिर्यादीने उलटतपासात दिलेल्या या कबुलींवरुन ही बाब स्पष्ट होते की, मयत प्रमोद हा सन २०२१ पर्यंत बेरोजगार होता व वनविभागातील नोकरी देखील त्याच्या आवडीची नव्हती. तसेच हे ध्वनीत होते की, नोकरी नसल्यामुळे त्याचे लग्न झालेले नव्हते. याच बाबीमुळे मयताने आत्महत्या केली असे गृहीत धरता येत नसले तरी मयताची एकंदरीतच मानसिक संरचनेमधे त्याचे उशीरा झालेले लग्न व बेरोजगारी या बाबींचा प्रभाव असू शकतो, ही शक्यता नाकारता येणार नाही.

१६. फिर्यादीने दिलेल्या या सर्व कबुलींचा विचार करता ही बाब निदर्शनास येते की, केवळ आरोपीच्या मानसिक छळाला कंटाळून मयताने आत्महत्या केली ही बाब स्पष्टपणे व सबळतेने सिध्द करण्यास हा पुरावा पुरेसा नाही. सर्वात महत्वाची बाब म्हणजे स्वतः मयताने फिर्यादीला आरोपी व त्याच्यातील भांडणाचे कुठलेही कारण सांगीतले नाही असे स्वतः फिर्यादीनेच नमूद केलेले आहे. प्रणाली व प्रमोद यांच्यात काहीतरी झाले, त्यांच्यात मोबाईलवरुन झटापट झाली, प्रमोदच्या डोळ्यात पाणी आले, प्रणाली फोन माहेरीच ठेवून आली, रात्रीच्यावेळी प्रमोद व प्रणालीच्या भांडणाचा आवाज ऐकू आला, इ. कथने आरोपीच्या विरोधात असून त्यांचा परस्पर समन्वय साधला असता असे निदर्शनास येते की, आरोपी व मयत यांच्यात भांडण

सदृश परिस्थीती असली तरी त्यांच्यातील भांडणाचे मुळ कारण स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे हे कारण मयतास आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणारे होते असा अनुमान निश्चितच काढता येवू शकत नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या **'विजयकुमार वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र व इतर, क्रिमीनल अपील क्र.९०५/२०२५'** मधील न्यायनिवाड्यानुसार केवळ क्रुर वागणूक अथवा छळ याबाबतचा आरोप, याकरिता प्रवृत्त करण्याची कुठलीही घटना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पध्दतीने सिध झाली नसेल तर केवळ क्रुर वागणूकीच्या आरोपावरुन कलम ३०६ भा.द.वि. खालील आरोप आकर्षीत होवू शकत नाहीत. याठिकाणी देखील सदरचा न्यायनिवाडा लागू होतो असे अनुमान मी काढले. कारण आरोपीने मयताचा छळ केल्याची कोणतीही घटना फिर्यादीने स्पष्ट केलेली नाही. तसेच दि.१४ ऑगस्ट २०२३ च्या आधी घडलेली कुठलीही घटना अभियोग पक्षाच्या साक्षीदारांनी नमुद केलेली नाही व त्यामुळे आरोपी व मयत यांच्यात भांडणे होत होती, ही बाब मान्य केली तरी केवळ त्या कारणावरुन आरोपीनेच मयताला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले असे अनुमान काढता येणार नाही.

१७. अभियोग पक्षाने फिर्यादीच्या साक्षीला परिपुष्टी देण्यासाठी साक्षीदार क्र.३ स्वाती दयानंद घोडके यांची साक्ष नि.२९ वर नोंदवली आहे. मयत व आरोपी ज्यांच्या घरी भाड्याने राहत होते त्या घराच्या स्वाती घोडके या मालक असून त्यांनीच सदर घटनेबाबत पोलिस स्टेशनला दि.१५ ऑगस्ट २०२३ रोजी पहिली माहिती दिली होती. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले की, दि.१५ ऑगस्ट २०२३ रोजी त्या ध्वजारोहणासाठी शाळेत

गेल्या होत्या व त्यांच्या शेजारी स्नेहल मिरजकर यांनी फोन करुन त्यांना कळवले होते की, त्यांचे भाडेकरु प्रमोद काका दार उघडत नाहीत. त्यांनी घरी येवून प्रणालीला विचारले असता तिने एवढेच सांगितले की, रात्री तिच्या मैत्रीणीचा फोन आला होता व मयताने त्याबाबत विचारणा केली होती व नंतर तो काही न बोलता आत निघून गेला. सदर साक्षीदाराने हे ही सांगितले की, मयत प्रमोद याने पोपटी रंगाच्या नायलॉनच्या दोरीने गळफास लावून घेतला होता. तिने तिच्या उलटतपासणीत हे मान्य केले की, तिच्या पतीने तक्रार दिली त्यावेळी प्रमोदचे नातेवाईक घटनास्थळी हजर होते व घटनेपूर्वी प्रणाली व प्रमोदचे जीवन त्यांच्या दैनंदीन पध्दतीने सुरु होते.

१८. या पुराव्यातील महत्वाची बाब म्हणजे केवळ रात्री मैत्रीणीचा फोन आला होता व मयताने त्याबाबत विचारले होते, ही बाब वगळता मयताच्या मृत्यूबाबत कुठलही संशयास्पद बाब या साक्षीदाराने सांगितलेली नाही. सदरच्या फोनवर संशय घ्यावयाचे ठरले तरी तपासी अंमलदारांनी त्याबाबत कुठलाही तपास केलेला दिसून येत नाही व यावरुनच मृत्यूच्या आधी आरोपी व मयत यांच्यात वाद झाला होता याबाबतचा पुरावा अभियोग पक्षाने सादर केला नाही असे अनुमान मी काढले. याउलट, घटनेच्यावेळी हजर असूनही मयताच्या नातेवाईकांनी आरोपीविरुध्द कुठलीही तक्रार दिली नाही असे या पुराव्यावरुन दिसून येते. शिवाय घरमालक असलेल्या या साक्षीदाराने सांगितल्यानुसार मयत व आरोपी यांच्यातील दैनंदिन जीवन योग्य पध्दतीने सुरु होते. सदर साक्षीदार घरमालक असल्याने व तेथेच राहत असल्याने भाडेकरूंच्या घरातील विकोपाचा वाद कळण्यास त्यांना पूर्ण

परिस्थिती असूनही त्यांनी त्या वादाबाबत काहीही सांगितले नाही यावरून आरोपी व मयत यांच्यातील संबंध विकोपास जाणे इतके खराब नव्हते असेच स्पष्ट होते व म्हणून साक्षीदार क्रमांक ३ ची साक्ष अभियोग पक्षाला समर्थन देण्यास सक्षम ठरली नाही असा निष्कर्ष मी काढला.

१९. साक्षीदार क्रमांक २ डॉ. अनिरुद्ध सतीश काकडे यांनी निशाणी पी–५ वरील शवविच्छेदन अहवालाबाबत साक्ष दिली आहे व मयताचा मृत्यू गळफास घेतल्याने झाला असे मत त्यांनी नमूद केलेले आहे. सदरची बाब बचाव पक्षाने वादातीत केलेली नाही व त्यामुळे मयताचा मृत्यू आत्महत्येने झाला ही बाब सिद्ध झालेली आहे, असे अनुमान मी काढले.

२०. साक्षीदार क्रमांक ४ जयसिंग प्रतापराव पाटील यांनी या गुन्ह्याचा तपास केलेला आहे व तपासाचा तपशील त्यांनी त्यांच्या सरतपासणीत नमूद केला आहे. मी यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे गुन्ह्याची पहिली खबर देण्यास झालेला २४ दिवसांचा विलंब त्यांनी स्पष्ट केलेला नाही. त्याचप्रमाणे जर खरेच मयत व आरोपी यांच्यात आरोपींच्या फोन व प्रेम संबंध यावरून वाद होते तर तपासी अंमलदारांनी आरोपीच्या फोनचे रेकॉर्ड व सी.डी.आर मागवून त्याबाबत सखोल तपासणी करणे आवश्यक होते. मात्र त्याबाबतचा कोणताही पुरावा अभियोग पक्षाने सादर केलेला नाही व त्यामुळे आरोपीनेच मयताला क्रूर वागणूक दिली व या क्रूर वागणुकीमुळेच मयत आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाला ही बाब सिद्ध होऊ शकली नाही, म्हणून साक्षीदार क्रमांक ४ चा पुरावा मी अमान्य केला.

२१. कलम ३०६ भा.द.वी. खालील दोषारोपाच्या सिद्धतेकरिता अभियोग पक्षाने भा.द.वि.च्या कलम १०७ खालील महत्त्वपूर्ण घटक म्हणजेच प्रोत्साहन, कट व फौजदारी सहाय्य या बाबी सिद्ध करायला हव्या. मात्र अभियोग पक्षाला आरोपीविरुद्ध कलम १०७ भा.द.वि. खालील कोणतीही कृती सिद्ध करता आलेली दिसून येत नाही व त्यामुळेच कलम ३०६ भा.द.वि. खाली कलम १०७ भा.द.वि.खालील घटकही सिध्द न झाल्याने आरोपीविरुध्दचे एकुण दोषारोपच सिद्ध होऊ शकले नाहीत, असे अंतिम अनुमान मी काढले व म्हणून मुद्दे क्र.१ चे उत्तर मी **'नाही'** असे दिले.

**मुद्दा क्र.२ बाबत –**

२२. मुद्दे क्र.१ च्या नकारार्थी निष्कर्षाअंती मी या निष्कर्षापर्यंत पोहोचले की, आरोपी ही भा.द.वि. कलम ३०६ खालील गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी प्रणाली प्रमोद कोळी हिची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये तिचे विरुध्द लावण्यात आलेल्या भा.द.वि. कलम ३०६ अन्वयेच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल म्हणजे, मयताचे दोन मोबाईल हॅण्डसेट मयताची आई म्हणजेच फिर्यादी जयश्री पांडुरंग कोळी हिला व आरोपीकडून जप्त करण्यात आलेला मोबाईल आरोपीला अपिल

कालावधीनंतर,पुर्वी दिले नसल्यास, कागदपत्रांची पडताळणीकरुन परत दयावा.

४. आरोपीने रक्कम रु.५०,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनकदबा संदर्भात फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये पुर्तता करणेची आहे.

येणेप्रमाणे न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

ACHALA HARSHAVARDHAN KASHIKAR

Digitally signed by ACHALA HARSHAVARDHAN KASHIKAR
Date: 2026.04.06 16:21:54 +0530

(ए. एच. काशीकर)

दिनांक ०१/०४/२०२६

तदर्थ जिल्हा न्यायाधीश क्र.१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,इस्लामपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.W.Pathan, Steno, (Grade-I) |
| Court Name | : | Adhoc District Judge – 1 & Addl. Sessions Judge, Islampur. |
| Date | : | 01/04/2026 |
| Signed by P.O. on | : | 06 /04/2026 |
| Uploaded on | : | 06/04/2026 |